महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा. क्रं./ प्रेस नोट/217/ पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक :– 21/06/2024

## 1)मो.सा.चोरी

**शिवाजीनगर :–** दिनांक 18.06.2024 रोजी चे 02.00 ते 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरून लेबर कॉलनी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा ॲक्टव्हा कंपनीची स्कुटी क्रं. एमएच.–26/बीबी–7799 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी इब्राहीम खान पि. अब्दुल हफीस खान, वय 34 वर्षे, व्यवसाय बेकरी चालक रा. लेबरकॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 210/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/131 मुंडे, मो.नं. 8805013616** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)इतवारा :–**दिनांक 17.06.2024 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **रामरहीम नगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडणाचे कारणावरून तलवार, लाकडी हॉकी, लाथा बुक्याने मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी बाबुमियॉ कुरेशी पि. अब्दुल खादर कुरेशी, वय 69 वर्षे, रा. रामरहीमनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 222/2024 कलम 326,324,504,506,34 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 वाजीद, मो. नं. 8975992449** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–**दिनांक 17.06.2024 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **रामरहीम नगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडणाचे कारणावरून लाकडी काठीने, फर्शीने, लाथाबुक्याने मारहाण करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सोहेल मोहम्मद पि. मोहम्मद गौस, वय 17 वर्षे, व्यवसाय बेकार रा. रामरहीमनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 223/2024 कलम 325,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/802 वाजीद, मो. नं. 8975992449** हे करीत आहेत.

**3)मुखेड :–**दिनांक 18.06.2024 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास, **फुलेनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे पत्नीचे हात उसने दिलेले तीस हजार रूपये न देता तुझी बहीण पुण्याला का निघुन गेली असे म्हणुन फिर्यादीस खंजरने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली. तसेच पायावर, नळीवर, खंजरच्या मोठीने पाठीवर मारले. वगैरे **फिर्यादी मुस्तकीम इसाक सय्यद, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. फुलेनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 190/2024 कलम 326,324,323, 04,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. नं. 8390695468** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**शिवजीनगर :–** दिनांक 20.05.2023 चे 00.00 ते दि. 20.06.2024 चे 00.00 वा. चे दरम्यान, **तेहरानगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस घराला स्लॅप टाकण्यासाठी तुझे माहेरहुन पाच लाख रूपये घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून, उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ करून माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फोन द्वारे नांदायला ये म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 209/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 507,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 सिरसाट, मो.क्रं. 8805013616** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**विमानतळ :–** दिनांक 19.06.2024 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **आसना टी पॉईंट जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे माधव ग्यानबा सुर्यवंशी, रा. गौतम नगर सांगवी ता. जि. नांदेड** हे आपली मोटार सायकल क्रमांक एमएच–26/पी–5805 हिचेवर बसुन घराकडुन असना मार्गे राज कॉर्नरकडे बाजार करण्यास जात असतांना यातील नमुद आरोपीने आपली ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच–11/सीएच–7476 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजी पणाने भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मोटार सायकलला पाठीमागुन जोराची धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी राजेश माधव सुर्यवंशी, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर सांगवी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 196/2024 कलम 279, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जोंधळे, मो.नं. 9175324824** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 20.06.2024 रोजी चे 02.00 वा. चे सुमारास, **विसावा गार्डन समोर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले ताब्यात लोखंडी खंजर, बाळगुन मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2026, शेख गफार पि. शेख इस्माईल, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 208/2024 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/43 पाटील, मो.क्र. 8805013616** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 20.08.2009 रोजी चे 11.00 ते दि. 19.06.2024 चे दरम्यान, **असदवन ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद तिन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व फिर्यादीचे पत्नीस आमचा प्लॉटचा व्यवसाय आहे व तुम्हला प्लॉट घेऊन देतो असे खोटे सांगुन फिर्यादीस प्लॉट न देता त्यांचे 4,09,000/–रूपये घेतले. प्लॉट दिला नसल्याने पैसे परत मागीतले असता पैसे नाहीत म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. पैसे घेवुन प्लॉट न देता फिर्यादीची फसवणुक कली. वगैरे **फिर्यादी शेख जहीर शेख बाबुमीयॉ, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. रामखडक उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 499/2024 कलम 420, 406, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2282 शेख इब्राहीम, मो. नं. 9834537582** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 20.06.2024 रोजी चे 18.20 वा. चे सुमारास, **धनेगाव येथील राम पाटील यांचे विट भट्टीचे मागील शेतात आखाडयावर मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 16,540/–रुपये जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1991 विक्रम बालाजी वाकडे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 500/2024 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो.नं. 8788371187** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड